**विशेख खटला क्र. १६/२०२१** **निशाणी क्र. ५१**

**आजरोजी पुढील सरतपास शपथेवर सुरू**

२. ज्या लिफाफयावर सहया केल्या तो लिफाफा व मेमरी कार्ड मला दाखवले तर मी ओळखू शकतो. तो लिफाफा व मेमरी कार्ड सिल बंद पाकिटात आहे. ते पाकिट आता न्यायालयासमक्ष, आरोपीसमक्ष व सरकारी वकिलांसमक्ष फोडण्यात आले. त्यामध्ये चार पाकिटे स्टेपलरने बंद केल्याचे आढळली. आता मला मेमरी कार्ड दाखवले त्याच मेमरी कार्डमध्ये लाचमागणी पडताळी बाबतचे व्हाईस रेकॉर्डींग सेव्ह केले आहे. त्यास आर्टिकल बी देण्यात येते. आता मला पाकिट दाखवले त्यात मेमरी कार्ड सिल केले होते. त्यावर माझी दुस-या पंचाची व पोलिस अधिकारी यांच्या सहया आहेत त्यास **आर्टिकल सी** देण्यात येते. त्या व्हाईस रेकॉर्डवरून तसेच मी स्वत: संभाषण ऐकले यावरुन पोलिसांची व आमची चार हजार रूपये लाच मागितली याबाबत खात्री झाली. त्यानंतर पोलिसांनी लाच देण्याची रक्कम तक्रारदाराला हजर करायला सांगितली. त्याने ती रक्कम हजर केली. ती रक्कम म्हणजे पाच रूपयाच्या आठ नोटा होत्या. त्या नोटांचे पहिल्यांदा एका को-या कागदावर नंबर लिहून घेतले व त्यावर आमच्या सहया घेतल्या. नंबर लिहिला व आमच्या सहया असलेला कागद दाखवला तर मी ओळखू शकतो. आता मला तो कागद दाखवला त्यावर नोटांचे नंबर व आमच्या सहया आहेत, तसेच पोलिसांच्या सहया आहेत, तोच कागद वर सांगितल्याप्रमाणे नोटांचे नंबर लिहिण्यासाठी वापरला होता. त्या कागदास **नि. ५४** देण्यात येते. फिर्यादीने हजर केलेल्या नोटा मला दाखवल्या तर मी ओळखू शकतो. आता मला पाचशे रूपयाच्या आठ नोटा दाखवल्या त्याच फिर्यादीने माझयादेखत हजर केल्या होत्या. त्यास पूर्वीच **आर्टिकल अ** देण्यात आले आहे. त्या नोटांना अॅथ्रासिन पावडर लावायची ठरले. पोलिसांनी आम्हाला त्या पावडरचे गुणधर्म सांगितले. त्या पावडरचा गुणधर्म ती पावडर ज्या वस्तूंना लावली ती वस्तू जर अंधारात नेली तर चकाकी दिसते, उजेडात चकाकी दिसत नाही असा सांगितला. त्यांनी गाडीत अंधार करून नोटेवर बॅटरी मारली असता चकाकी नव्हती. नंतर उजेड करून पावडर लावली. नंतर गाडीत अंधार करून बॅटरी लावली असता नोटेवर चकाकी दिसून आली. लाचमागणी पडताळी व पावडर लावण्याबाबत जागेवर पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला त्यावर प्रत्येक पानावर माझी , दुस-या पंचाची, पोलिस अधिकारी यांची सही आहे. त्यास **नि. ५५** देण्यात येते. पहिले मेमरी कार्डची हॅश व्हॅल्यू काढली हॅश व्हॅल्यूप्रमाणपत्रावर माझया दुस-या पंचाच्या व पोलिसांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि. ५६** देण्यात येते.

३. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. तो रेकॉर्डर तक्रारदाराच्या

गळयात अडकवला. त्या नोटा तक्रारदाराकडे दिल्या. त्याने शर्टच्या डाव्या खिशात त्या नोटा ठेवल्या. पोलिसांनी मला व तक्रारदाराला गाडीवर आरोपी नं. २ हरिदास याच्या कार्यालयात जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही हरीदास यांच्या कार्यालयाकडे निघालो. पोलिस गाडी आमच्या मागे होती. पोलिसांनी आरोपीने नोटा घेतल्यानंतर कोठे ठेवतो, कोणाकडे देतो यावर लक्ष ठेवण्यास मला सांगितले होते. तसेच फिर्यादीला लाच स्वीकारल्यानंतर डोक्यावरून हात फिरून खून करायची असे सांगितले होते. त्यानंतर आम्ही हरदास यांच्या कार्यालयात गेलो. तेथे हरदास साहेब बसले होते. तक्रारदार त्यांना म्हणाला तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी चार हजार रूपये आणले आहेत. तक्रारदाराने चार हजार रूपये हरदास साहेबांच्या हातात दिले व पैसे मोजून घ्या म्हणाला. तक्रारदाराने त्यानंतर डोक्यावरून हात फिरून लाच स्वीकारल्याचा इशारा केला. पोलिस व दुसरे पंच आतमध्ये आले. पोलिसांनी हरदास यांचे दोन्ही हात धरले. हरदासने सांगितले की, हे पैसे त्याने टकले साहेब यांच्याकरीता घेतले आहेत. तेथे पोलिसांनी व्हीडीओ रेकॉर्डीग केले. हरदास यांच्या हातातील नोटा या पंच नंबर दोन यांच्याकडे दिल्या. बॅटरी लावून त्याच नोटा आहेत का याची खात्री करून घेतली. बॅटरी लावल्यावर पावडर नोटांना व हरदास यांच्या हाताला दिसून आली. तक्रारदाराच्या गळयातून व्हाईस रेकॉर्डर काढला व व्हाईस रेकॉर्डीग ऐकली. व्हाईस रेकॉर्डर मधून मेमरी कार्ड काढून त्याची हॅश व्हॅल्यू काढली. त्याचे हॅश व्हॅल्यू प्रमाणपत्र तयार केले. आता मला ते प्रमाणपत्र दाखवले त्यावर माझी सही आहे. दुस-या पंचाची सही आहे, पोलिस अधिका-याची सही आहे. त्यास **नि. ५७** देण्यात येते. मेमरी कार्ड पॅक करून सिल केले. ते मेमरी कार्ड मला दाखवले तर मी ओळखू शकतो आता मला मेमरी कार्ड दाखवले तेच मेमरी कार्ड माझया देखत सिल झाले होते. त्या मेमरी कार्डास **आर्टिकल डी** देण्यात येते. ज्या पाकिटामध्ये ते कार्ड ठेवले होते ते मी ओळखू शकतो. आता मला पाकिट दाखवले त्याच पाकिटात मेमरी कार्ड ठेवले होते त्यावर माझया, दुस-या पंचाच्या, पोलिस अधिकारी यांच्या सहया आहेत. त्यास **आर्टिकल इ** देण्यात येते. तेथून आम्ही सर्वजण आरोपी हरदास सह शासकीय विश्रामगृहात गेलो. तेथे थोडयावेळाने टकले यांना नगरचे पोलिस घेवून आले. तेथे पंचनामा केला प्रिंट काढली व वाचायला दिली. आता मला यशस्वी सापळा पंचनामा दाखवला त्यावर माझी सही आहे दुस-या पंचाची सही आहे, पोलिसांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ५८** देण्यात येते. ज्या कॅमे-यात व्हीडीओ रेकॉर्डीग केले होते त्यातील सीडी काढून त्याची हॅश व्हॅल्यू काढली. त्याबाबतचे प्रमाणपत्र तयार केले. ती सीडी एका पाकिटात सिलबंद केली आता दोषारोपपत्रातील सिलबंद पाकिट साक्षीदार, आरोपी, सरकारी वकील व न्यायालयासमक्ष फोडण्यात आले. त्यामध्ये एक सीडी आढळली, ती सीडी आमच्या देखत कॅमे-यातून काढली होती. त्या सीडीस **आर्टिकल एफ** देण्यात येते. आता मला सीडी चे हॅश व्हॅल्यू

प्रमाणपत्र दाखवले त्यावर माझी, दुस-या पंचाची, पोलिस अधिका-याची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि. ५९** देण्यात येते. ज्या पाकिटामध्ये सी डी सिलबंद केली होती. ते पाकिट आता मला दाखवले त्यावर माझी, दुस-या पंचाची, पोलिस अधिका-याची सही आहे त्यास **आर्टिकल जी** देण्यात येते. त्यानंतर मी नगरला गेलो. त्यानंतर दुस-यादिवशी मला नगरला एसीबी ऑफिसमध्ये बोलवले. तेथे टकले व हरदास हे आरोपी होते. व्हॉईस रेकॉर्डरमध्ये मेमरी कार्ड टाकून दोन्ही आरोपींचे वेगवेगळया मेमरी कार्डमध्ये आवाजाचे नमुने घेतले. टकले याचे आवाजाचे नमुने घेतलेले मेमरीकार्डची हॅश व्हॅल्यू काढली होती. त्याचे प्रमाणपत्र तयार केले होते ते आता मला दाखवले त्यावर माझी सही आहे. ते प्रमाणपत्र दोन पानांचे चार फाईलचे असून त्यास एकत्रात **नि. ६०** देण्यात येते. हरदास याचे आवाजाचे नमुने घेतलेले मेमरीकार्डची हॅश व्हॅल्यू काढली होती. त्याचे प्रमाणपत्र तयार केले होते ते आता मला दाखवले त्यावर माझी सही आहे. ते प्रमाणपत्र दोन पानांचे चार फाईलचे असून त्यास एकत्रात **नि. ६१** देण्यात येते.

४. टकले याचे रेकॉर्डींग असलेले मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमधून काढून आमच्या देखत सिल केले ते कार्ड दाखवले तर मी ओळखू शकतो आता मला मेमरी कार्ड दाखवले ते टकले यांचे रेकार्डींग असलेले आहे. त्यास **आर्टिकल एच** देण्यात येते. ज्या पाकिटामध्ये मेमरी कार्ड सिल केले त्यावर माझी, दुस-या पंचाची, पोलिस अधिका-याची सही आहे त्यास **आर्टिकल आय** देण्यात येते.

५. हरदास याचे रेकॉर्डींग असलेले मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमधून काढून आमच्या देखत सिल केले ते कार्ड दाखवले तर मी ओळखू शकतो आता मला मेमरी कार्ड दाखवले ते टकले यांचे रेकार्डींग असलेले आहे. त्यास **आर्टिकल जे** देण्यात येते. ज्या पाकिटामध्ये मेमरी कार्ड सिल केले त्यावर माझी, दुस-या पंचाची, पोलिस अधिका-याची सही आहे त्यास **आर्टिकल के** देण्यात येते. आवाजाचा नमुना घेतल्याबाबत पंचनामा केला होता. तो पंचनामा आता मला दाखवला त्याच्याप्रत्येक पानावर माझया, पंच नं.२ च्या व पोलिस अधिकारी यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा आहे त्यास **नि. ६२** देण्यात येते. व्हाईस रेकॉर्डींगचे स्क्रीप्ट तयार केले होते त्यावर आमच्या सहया घेतल्या. आता मला ते स्क्रीप्ट दाखवली ती तिन पानाची असून त्यावर माझया, दुस-या पंचाच्या व पोलिस अधिकारी यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि. ६३** देण्यात येते. पोलिसांनी माझा जबाब घेतला होता.

६. घटनेच्या दिवशी दोन्ही आरोपींना आमच्या देखत अटक केली होती. अटकपंचनामे केले होते त्यावर आमच्या सहया घेतल्या होत्या. ते अटक पंचनामे आता मला दाखवले त्यावर माझया, दुस-या पंचाच्या व पोलिस अधिकारी यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे.

त्यास **नि. ६४ व ६५** देण्यात येते. दोन्ही आरोपींना मी ओळखू शकतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. लाच स्वीकारली त्यावेळेस फोटो काढले होते. आता मला फोटो दाखवले ते लाच स्वीकारल्यानंतर काढले होते, त्यापैकी एका फोटोत मी आहे. एका फोटोत नोटा दिसतात. तर एका फोटोत आरोपीचे हात दिसतात.

**वेळेअभावी उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृती,

SHRIPAD SHARAD DESHPANDE
Digitally signed by SHRIPAD SHARAD DESHPANDE
Date: 2026.05.22 17:55:01 +0530

**(एस. एस. देशपांडे)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
श्रीरामपूर

दिनांक : २१/०५/२०२६